प/२६०


**महाराष्ट्र शासन**
**शिक्षण संचालनालय, (उच्च शिक्षण)**
**महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे ४११ ००१**
Web : www.dhepune.gov.in
E-mail : prash.dhepune@nic.in

फोन नं.०२०/२६१२२११९, २६०५१५१२, २६१३०६२७, २६१२४६३९ फोन नं.०२०/२६१११५३


**:: पाहिजेत ::**

शिक्षण संचालनालय, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या आस्थापनेवरील पुणे / मुंबई / औरंगाबाद व नागपूर येथील विधी अधिकारी ही पदे कंत्राटी तत्वावर रुपये १६०००/- (अक्षरी रुपये सोळा हजार मात्र) मासिक ठोक वेतनावर (वेतनामध्ये वाढ प्रस्तावित आहे.) भरण्यासाठी अर्ज मागविण्यांत येत आहेत.

तसेच शिक्षण संचालनालय, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या कार्यालयातील सीईटी सेलमध्ये लिपिक-नि-टंकलेखक (एक पद), शिपाई (एक पद) कंत्राटी तत्वावर २०१७-१८ साठी ११ महिन्याच्या करारावर सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कुशल/अकुशल कर्मचाऱ्यांना देय दराने वेतनावर भरण्यासाठी अर्ज मागविण्यांत येत आहेत.

सदर पदांसाठी आवश्यक शैक्षणिक अर्हता, पदांची कर्तव्ये व जबाबदाऱ्या, कामाचे स्वरुप, पदांच्या अटी व शर्ती याबाबतची सविस्तर माहिती संचालनालयाच्या संकेतस्थळावर (www.dhepune.gov.in) उपलब्ध आहे.

इच्छूक उमेदवारांनी आपला अर्ज शैक्षणिक अर्हतेच्या, अनुभवाच्या व इतर पुरक प्रमाणपत्रांच्या प्रतिसह (विधी अधिकारी पदाकरीता बार कौन्सिल ऑफ इंडिया यांचेकडील प्राप्त सनदीसह) जाहिरात प्रसिध्दीच्या दिनांकापासून १५ दिवसांपर्यंत शिक्षण संचालनालय, उच्च शिक्षण, मध्यवर्ती इमारत, पुणे ४११००१ या कार्यालयाकडे पाठवावेत. संचालनालयास प्राप्त झालेल्या अर्जांची छाननी करुन मुलाखतीस स्वतंत्र पत्र देवून बोलविण्यांत येईल.

(डॉ.धनराज माने)
शिक्षण संचालक (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, पुणे - १

महाराष्ट्र शासन
शिक्षण संचालनालय, (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे ४११ ००१
Web : www.dhepune.gov.in
E-mail : prash.dhepune@nic.in

फोन नं.०२०/२६१२२११९, २६०५११५१२, २६१३०६२७, २६१२४६३९ फोन नं.०२०/२६१११९१५३

:: पाहिजेत ::

शिक्षण संचालनालय, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या आस्थापनेवरील पुणे / मुंबई / औरंगाबाद व नागपूर येथील विधी अधिकारी ही पदे कंत्राटी तत्वावर रुपये १६०००/- (अक्षरी रुपये सोळा हजार मात्र) मासिक ठोक वेतनावर (वेतनामध्ये वाढ प्रस्तावित आहे.) भरण्यासाठी अर्ज मागविण्यांत येत आहेत.

तसेच शिक्षण संचालनालय, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या कार्यालयातील सीईटी सेलमध्ये लिपिक-नि-टंकलेखक (एक पद), शिपाई (एक पद) कंत्राटी तत्वावर २०१७-१८ साठी ११ महिन्याच्या करारावर सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कुशल/अकुशल कर्मचाऱ्यांना देय दराने वेतनावर भरण्यासाठी अर्ज मागविण्यांत येत आहेत.

**सदर पदांसाठी आवश्यक शैक्षणिक अर्हता, पदांची कर्तव्ये व जबाबदाऱ्या, कामाचे स्वरुप, पदांच्या अटी व शर्ती याबाबतची सविस्तर माहिती पुढीलप्रमाणे -**

विधी अधिकारी या पदांसाठी आवश्यक शैक्षणिक अर्हता, पदांची कर्तव्ये व जबाबदाऱ्या, कामाचे स्वरुप, पदांच्या अटी व शर्ती याबाबतची सविस्तर माहिती.

अ) सदर पदांची नेमणूक ही पूर्णत: कंत्राटी पध्दतीने असेल. या अधिकारी / कर्मचाऱ्यांना शासकीय कर्मचारी म्हणून गणले जाणार नाही.

ब) सदर नेमणूका या करार पध्दतीने प्रथम ११ महिन्यांसाठी करण्यांत येतील. ११ महिन्यानंतर आवश्यकता असल्यास करारनाम्याची मुदत वाढविता येईल, अशा प्रकारे जास्तीत जास्त ३ वेळा नियुक्ती देता येईल. त्यानंतर अशा उमेदवारांची पुन:श्च नियुक्ती करणे आवश्यक आहे असे सक्षम प्राधिकाऱ्याचे मत झाल्यास त्या उमेदवारास पुन:श्च निवड प्रक्रियेस सामोरे जावे लागेल.

क) संबंधित नियुक्ती प्राधिकारी शासनाच्यावतीने नियुक्तीच्यावेळी संबंधितांबरोबर विहित प्रपत्रात करार करतील. सोबत कराराचे विहित प्रपत्र जोडले आहे.

ड) करार पध्दतीने नेमणूक करण्यांत येणाऱ्या अधिकारी / कर्मचाऱ्यांना एकत्रित वेतन आणि अनुज्ञेय दूरध्वनी व प्रवासखर्चाव्यतिरिक्त इतर कोणतेही भत्ते अनुज्ञेय होणार नाहीत.

इ) करार पध्दतीने नियुक्त करावयाच्या पदासाठी शैक्षणिक अर्हता व अनुभव, कर्तव्ये व जबाबदाऱ्या यांचा तपशिल सोबत जोडलेला आहे. शासन निर्णयातील तरतूदींनुसार तथा शासनाच्या प्रचलित धोरणानुसार उमेदवाराची निवड करण्यासाठी आवश्यक कार्यवाही करावी.

संचालनालयाच्यास्तरावरील विधी अधिकारी ही गट-अ ची पदे मंजूर आहेत. गृहविभागाच्या दिनांक १५.०९.२००६ च्या शासन निर्णयामध्ये विधी अधिकारी गट-अ यांची कर्तव्ये व जबाबदाऱ्या व शैक्षणिक अर्हता दिलेली आहे, ती खालील प्रमाणे.

१) कार्यालयाकडे प्राप्त होणाऱ्या सर्व प्रकारच्या कायदेविषयक / न्यायालयीन प्रकरणी सल्ला देणे व न्यायालयीन प्रकरणे हाताळणे.

२) सेवाविषयक / प्रशासकीय बाबी / विभागीय चौकशी तथा समकालीन कायद्याची प्रस्थापित स्थितीबाबत सर्व प्रकरणी कायदेशीर मत देणे, याकरीता अधिनियम / शासन निर्णय / परिपत्रक / महाराष्ट्र नागरी सेवा नियम / विद्यापीठाचे अधिनियम, परिनियम व इतर बाबी सर्व नियमांचा अभ्यास असणे आवश्यक आहे.

३) न्यायालयीन प्रकरणे तत्परतेने निकाली काढण्यासाठी सरकारी वकीलांकडे पाठपुरावा करणे, न्यायालयीन प्रकरणात सादर करावयाचे परिच्छेदनिहाय अहवाल / प्रतिज्ञापत्रे संबंधित अधिकारी / कर्मचारी यांच्या मदतीने तयार करणे, कार्यालयास प्राप्त झालेल्या नोटीसला कायदेशीर उत्तर देणे.

४) शपथपत्राचा मसुदा तयार करणे व त्यास सक्षम प्राधिकाऱ्याची मान्यता घेऊन न्यायालयात विहित मुदतीत सादर करणे.

५) जेथे शासनाच्या विरोधात न्यायालयाने निकाल दिलेला आहे अशा प्रकरणामध्ये न्यायालयाच्या निर्णयाचा अभ्यास करुन तद्नुषंगाने अपील दाखल करण्याच्या संदर्भात उचित कार्यवाही करणे.

६) अपील करणे योग्य असल्यास व तसा शासनस्तरावरुन निर्णय झाल्यास अपीलाचा मसुदा तयार करुन तो संबंधित सरकारी वकीलांकडे पाठविणे व अपीलाचा अंतिम निर्णय लागेपर्यंत पाठपुरावा करणे.

७) विधी विषयक कामकाजाबाबत वेळोवेळी नेमून दिलेली कामे विहित मुदतीत पार पाडणे.

८) निकाली निघालेल्या प्रकरणाबाबत न्यायालयाच्या आदेशानुसार कार्यवाही करणेबाबत क्षेत्रीयस्तर, संचालनालयस्तर, शासनस्तरावर पाठपुरावा करणे.

**शैक्षणिक अर्हता व अनुभव :**

१) उमेदवार मान्यताप्राप्त विद्यापीठाचा कायद्याची पदवीधर असावा तो सनदधारक असावा.

२) वकीली व्यवसायाचा ७ वर्षाचा अनुभव असावा.

३) उमेदवार सेवाविषयक, प्रशासनिक अशा सर्व प्रकारच्या कायद्याची स्थिती तथा विभागीय चौकशी इत्यादी बाबतीत ज्ञानसंपन्न असेल. ज्यामुळे कायदेविषयक कार्यवाही तो कार्यक्षमतेने पार पाडू शकेल.

४) उमेदवारास मराठी, हिंदी व इंग्रजी भाषांचे पुरेसे ज्ञान असेल.

**उमेदवाराचे वय :**

नियुक्तीच्यावेळी ४५ वर्षापेक्षा जास्त नसेल.

**शिक्षण संचालनालय, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या कार्यालयातील सीईटी सेलमध्ये लिपिक-नि-टंकलेखक या पदांसाठी आवश्यक शैक्षणिक अर्हता, पदांची कर्तव्ये व जबाबदाऱ्या, कामाचे स्वरुप, पदांच्या अटी व शर्ती याबाबतची सविस्तर माहिती.**

अ) सदर पदांची नेमणूक ही पूर्णत: कंत्राटी पध्दतीने असेल. या कर्मचाऱ्यांना शासकीय कर्मचारी म्हणून गणले जाणार नाही.

ब) सदर नेमणूका या करार पध्दतीने प्रथम ११ महिन्यांसाठी करण्यांत येतील. ११ महिन्यानंतर आवश्यकता असल्यास करारनाम्याची मुदत वाढविता येईल, अशा प्रकारे जास्तीत जास्त ३ वेळा नियुक्ती देता येईल. त्यानंतर अशा उमेदवारांची पुन:श्च नियुक्ती करणे आवश्यक आहे असे सक्षम प्राधिकाऱ्याचे मत झाल्यास त्या उमेदवारास पुन:श्च निवड प्रक्रियेस सामोरे जावे लागेल.

क) संबंधित नियुक्ती प्राधिकारी शासनाच्यावतीने नियुक्तीच्यावेळी संबंधितांबरोबर विहित प्रपत्रात करार करतील. सोबत कराराचे विहित प्रपत्र जोडले आहे.

ड) करार पध्दतीने नेमणूक करण्यांत येणाऱ्या कर्मचाऱ्यांना सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कुशल/अकुशल कर्मचाऱ्यांना देय दराने वेतनाव्यतिरिक्त इतर कोणतेही भत्ते अनुज्ञेय होणार नाहीत.

इ) करार पध्दतीने नियुक्त करावयाच्या पदासाठी शैक्षणिक अर्हता व अनुभव, कर्तव्ये व जबाबदाऱ्या यांचा तपशिल खाली दिलेला आहे. शासन निर्णयातील तरतूदींनुसार तथा शासनाच्या प्रचलित धोरणानुसार उमेदवाराची निवड करण्यांत येणार आहे.

**शैक्षणिक अर्हता व अनुभव :**

१. महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाची माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा (एस.एस.सी.) किंवा महाराष्ट्र शासनाने एस.एस.सी.च्या समतुल्य म्हणून घोषित केलेली अर्हता/ परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक.
२. मराठी टंकलेखनाचा वेग ३० शब्द प्रति मिनिट व इंग्रजी टंकलेखनाचा वेग ४० शब्द प्रति मिनिट या अर्हतेचे शासकीय वाणिज्य परीक्षा मंडळाचे प्रमाणपत्र असणे आवश्यक.
३. शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्रमांक एसपीई १०१२/(१०८/१२)/साशि-१, दिनांक ३१.१०.२०१३ नुसार अथवा तदनंतर शासनाने वेळोवेळी आदेश काढून विहीत केलेली संगणक टंकलेखन अर्हता-बेसिक कोर्स इन कॉम्प्युटर टायपिंग मराठी ३० शब्द प्रति मिनिट अथवा बेसिक कोर्स इन कॉम्प्युटर टायपिंग इंग्रजी ४० शब्द प्रति मिनिट समकक्ष अर्हता म्हणून स्वीकारार्ह आहे.
४. महाराष्ट्र शासनाच्या माहिती तंत्रज्ञान संचालनालयाने वेळोवेळी विहित केलेले संगणक हाताळणीबाबतची परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक.

**उमेदवाराचे वय :**

नियुक्तीच्या वेळी वय ४५ वर्षापेक्षा जास्त नसेल.

- **शिपाई**

**शैक्षणिक अर्हता व अनुभव :**

१. उमेदवार प्राथमिक शाळेची चौथी इयत्ता उत्तीर्ण असावा.
२. मराठी व हिंदी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक आहे.

**उमेदवाराचे वय :**

१. नियुक्तीच्या वेळी वय ४५ वर्षापेक्षा जास्त नसेल.